# महाराष्ट्र राज्य विदयुत पारेषण कंपनी मर्या.

## स्थापत्य बांधकाम व सुव्यवस्था विभाग, सोलापूर

## <u>स्वारस्य अभिरुची</u>

महाराष्ट्र राज्य विदयुत पारेषण कंपनी मर्यादित हयांचे अंतर्गत मौजे वटवटे, तालुका- मोहोळ जिल्हा- सोलापूर व परिसर येथे २२०/१३२/३३ के.व्ही. उपकेंद्राचे बांधकाम प्रस्तावित आहे. त्याकरिता खाजगी मालकी हक्काची जमिन चौरस अथवा आयताकृती आकाराची अंदाजे २५० मी x २५० मी मापाची (६ हे २५ आर क्षेत्रफळ) असलेली अशी जड वाहतूक होण्यायोग्य रस्त्यालगत जमिनीची आवश्यकता आहे. उपरोक्त जमीन मौजे वटवटे, (१७ अंश ३४ मिनिट ४५.५४ सेकंद अक्षांश व ७५ अंश ३८ मिनिट ५३.४६ सेकंद रेखांश) तालुका- मोहोळ, जिल्हा- सोलापूर या अक्षांश-रेखांश पासून ०३ कि. मी. त्रिजेच्या अंतराच्या आत असावी. वरील वर्णनाची जमीन विक्री करण्यास इच्छुक असणा-या जमीन धारकांनी किंवा २ किंवा अधिक एकत्रित जमीन धारकांनी अथवा जमीन कुलमुखत्यार धारकांनी खाली नमुद केलेल्या जमिनी संबंधित कागदपत्राच्या साक्षांकित प्रतीसह स्वारस्य अर्ज खालील निर्देशित कार्यालयास दोन वेगळया बंद लिफाफ्यामध्ये सादर करावे.

संबंधीत जमिनीचे भूसंपादन हे महाराष्ट्र शासनाच्या ‘खाजगी जमिन खाजगी वाटाघाटीद्वारे भूसंपादन करणेबाबत आवश्यक जमिन शासन, महसुल व वन विभागाकडील निर्णय क्रं.संकिर्ण/०३/२०१५ प्र.क्र.३४/अ/२, दि.१२.०५.२०१५ क्रं.संकिर्ण/०३/प्र.क्र.३४/अ/२, दि.३०.०९.२०१५ व परिपत्रक एल.क्यु.एन.०१/२०१७/प्र.क्र./१२/अ/२, दि.२५.०१. २०१७ मध्ये विषद केलेल्या कार्यपद्धतीनुसार खाजगी जमिन सार्वजनिक प्रयोजनासाठी खाजगी वाटाघाटीने थेट खरेदी घेणेकामी प्रस्तावित केले आहे.

संबंधीत जमिनीचा भूसंपादन मोबदला दर हा वर उल्लेख केलेल्या महाराष्ट्र शासनाच्या ‘खाजगी जमिन खाजगी वाटाघाटीद्वारे भूसंपादन करणेबाबत आवश्यक जमिन शासन, महसुल व वन विभागाकडील निर्णय क्रं.संकिर्ण/०३/२०१५ प्र.क्र.३४/अ/२, दि.१२.०५.२०१५ क्रं.संकिर्ण/०३/प्र.क्र.३४/अ/२, दि.३०.०९.२०१५ व परिपत्रक एल.क्यु.एन. ०१/२०१७/प्र.क्र./१२/अ/२, दि.२५.०१.२०१७ नुसार येणारा दर किंवा जमिनधारकाने दिलेल्या बंद लिफाफा क्रमांक-२ मधील **‘‘परिशिष्ट-ब’’** प्रमाणे जमीनधारकांनी मागणी केलेला मोबदला दर यापैकी जो दर कमी असेल तो दर जमिन खरेदी घेणेकामी लागु राहिल.

अर्जासोबत बंद लिफाफ्यामध्ये द्यावयाची कागदपत्रे...

१. अदयावत ७/१२ उतारा / गट स्किमचा उतारा
२. खसरा नकाशा गाव नकाशासाहित
३. गाव नमुना ८ अ / ६ ड पत्रक उतारे
४. टोच नकाशा (चतु:सिमा नकाशा)
५. १५ वर्षाच्या कलावधीसाठी मान्यंता प्राप्त वकीलातर्फे टायटल/सर्च रिपोर्ट
६. स्वारस्य अभिरूची प्रस्तावा अंतर्गत जमिन क्षेत्रावर असलेला बोजा बाबतचा तपशिल
७. जमिन धारकाने धारण केलेल्या जमिनीचा एकूणे क्षेत्रफळ दर्शविणारा नकाशा
८. जमिनीची लांबी, रूंदी व एकूण क्षेत्रफळ दर्शविणारा नकाशा
९. जमीन जर कोणत्याही प्रकल्पात किंवा इतर कारणात्सव आरक्षित असल्यास जिल्हाधिकारी यांचे ना-हरकत प्रमाणपत्र किंवा जिल्हाधिकारी परवानगीसाठी त्यांच्या कार्यालयात दाखल केलेल्या सेतू मार्फत अर्जाची प्रत अथवा पुरावा.

जमीन धारकांनी अथवा जमिन कुलमुखत्यार धारकाने आपले स्वारस्य अर्ज, **दिनांक-१९.११.२०२५ पर्यंत १७:०० वाजेपर्यंत** बंद लिफाफा क्रमांक-१ मध्ये वरील क्रं ०१ ते ०९ प्रमाणे जमीनीचे कागदपत्रे व बंद लिफाफा क्रमांक-२ मध्ये परिशिष्ट-ब, असे दोन्ही बंद लिफाफे हे कार्यकारी अभियंता (स्थापत्य) हयांच्या खाली दिलेल्या पत्यावर स्वहस्ते किंवा प्रतिनिधी मार्फत पोहचतील अशा बेताने पाठवावे. कोणत्याही कारणामुळे उशिरा प्राप्त होणारे स्वारस्य अर्ज विचारात घेतले जाणार नाहीत. कारण न देता कोणतेही किंवा सर्व स्वारस्य अर्ज नाकारण्यात येण्याचा हक्क हस्ताक्षर कर्त्या अधिका-याने राखून ठेवला आहे.

संपर्क अधिकारी प्रिती शिंदे, अतिरिक्त कार्यकारी अभियंता (स्था) (प्रभारी), सोलापूर. मोबाईल नंबर-८८५९६०१०३१४. अधिक माहितीसाठी या संकेत स्थळावर संपर्क करा- www.mahatransco.in

**टीप**- लिफाफा क्रं-२ मध्ये दयावयाचा परिशिष्ठ 'ब' www.mahatransco.in या संकेत स्थळावरुन घ्यावा.

कार्यकारी अभियंता (स्थापत्य)
अउदा.स्था.बां.नि.सु., विभागीय कार्यालय,
वैशंपायन वैदयकिय महाविदयालय शेजारी,
रंगभवन, सोलापुर – ४१३००३

---

# महापारेषण
## परिशिष्ट-ब

**कामाचे नांव**- प्रस्तावित २२०/१३२/३३ के.व्ही. उपकेंद्र उभारणीसाठी मौजे वटवटे, तालुका- मोहोळ जिल्हा- सोलापूर येथे आवश्यक खाजगी जमिन धारकाकडून खाजगी वाटाघाटी साठी निविदा प्राप्त करणेबाबत.

| अ.क्रं. | जमिन मालकाचे नांव | गांव व तालूका | ७/१२ उता-यावरील क्षेत्र | प्रती एकर मोबदला दर रुपये |
|---|---|---|---|---|
| १ | | | | |
| २ | | | | |
| ३ | | | | |

१. नोंदणी व मुद्रांक शुल्क जमिन खरेदीवेळी महापारेषण मार्फत भरला जाईल.
२. सरकारी कर चालु नियमाप्रमाणे जसे शेतसारा, महसुल कर, वस्तु व सेवा कर, आयकर इत्यादी खरेदी तारखे पर्यंत लागु असलेले देयके जमिन मालकाने भरावा लागेल.
३. तात्पुरते शेड, स्थायी बांधकाम, विहिर, पिक, झाडे, बांध इत्यादी यांचे कोणतेही अतिरिक्त भरपाई रक्कम दिली जाणार नाही.
४. नियोजित जमिन ही कोणत्याही सरकारी/ बॅंक/ वित्तीय संस्था किंवा व्यक्ती यांच्याकडे गहाण, तारण नसावी.
५. भूसंपादन प्रक्रियेदरम्यान महापारेषणतर्फे आगाऊ/अंतिरिम रक्कम दिली जाणार नाही. निश्चित करण्यात आलेली अंतिम देय रक्कम हि संबंधित भूधारकाच्या बॅंक खात्यामध्ये जमा करण्यात येईल.

भुधारकची/ कुलमुखत्यारची स्वाक्षरी
भुधारकची/ कुलमुखत्यारची नाव
स्थळ :-
दिनांक :-

कार्यकारी अभियंता (स्थापत्य)
अउदा.स्था.बां.नि.सु., विभागीय कार्यालय,
वैशंपायन वैदयकिय महाविदयालय शेजारी,
रंगभवन, सोलापुर – ४१३००३

---